# मराठी (प्रथमभाषा) कुमारभारती

**इयत्ता दहावी कृतिपत्रिका**

**वेळ- ३ तास एकूण गुण-८०**

---

## कृतिपत्रिकेसाठी सूचना

(१) सूचनेनुसार आकलनकृती व व्याकरणामधील आकृत्या पूर्ण कराव्यात.

(२) आकृत्या पेननेच काढाव्यात.

(३) उपयोजित लेखनातील कृतींसाठी (सूचना, निवेदन) आकृतीची आवश्यकता नाही. तसेच या कृती लिहून घेऊ नयेत.

(४) विभाग ५- उपयोजित लेखन प्र.५ (अ) (२) सारांशलेखन या घटकासाठी गद्य विभागातील प्र.१ (इ) अपठित उतारा वाचून त्या उताऱ्याचा सारांश लिहावयाचा आहे.

(५) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखन नियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

### विभाग १ गद्य

### पठित गद्य

**प्र. १. (अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

(१) परिणाम लिहा. ०१

१. अरुणिमाचा ऑक्सिजन साठा संपल्याचा परिणाम .................

२. चुकीचे विधान शोधा. ०१

अरुणिमाच्या मते.................

(अ) प्रयत्न निष्फळ ठरणे म्हणजे अपयश नाही.

(आ) कमकुवत ध्येय म्हणजे अपयश.

(इ) आयुष्यात चांगली व्यक्ती बनणे महत्त्वाचे.

(इ) नशिबापेक्षा कर्तृत्वावर विश्वास ठेवावा.

> आता मी उतरू लागले होते. जेमतेम ४०-५० पावलांवरच माझा ऑक्सिजन साठा संपला...एक सांगू? लक, भाग्य, किस्मत, डेस्टिनी असल्या भाकड शब्दांना मी नाही मानत; पण Fortune favours the braves यावर माझा पूर्ण विश्वास आहे...जेव्हा मी गुदमरू लागले, श्वास घेण्याचा प्रयत्न करू लागले, अगदी त्याचवेळी एका ब्रिटिश माणसाने ओझे होते म्हणून फेकून दिलेला जास्तीचा एक ऑक्सिजन सिलिंडर आम्हांला दिसला. माझ्या शेरपाने तो चटकन मला अडकवला. सावकाश आम्ही त्या –डेथ झोन◦ मधून सही सलामत खाली उतरलो. वर चढण्यापेक्षा खाली उतरताना होणाऱ्या मृत्यूंचे प्रमाण जास्त आहे...आणि आम्ही ते ओलांडून आलो होतो. –माझा दिवस◦ अखेर आला होता...गिर्यारोहकांच्या चढाईच्या टप्प्यातले एक महत्त्वाचे शिखर –एव्हरेस्ट◦ मी सर केले होते!
>
> गिर्यारोहणाने मला खूप महत्त्वाचे काही धडे दिले. माझ्यात आत्मविश्वास जागवला. नेतृत्व, गटबांधणी यांचे धडे तर मिळालेच; पण एक पोलादी कणखरपणा माझ्यात निर्माण केला. मित्रांनो, आपण आयुष्यात काय मिळवतो हे महत्त्वाचं नाही, तर ही कमाई आपल्याला अधिक चांगली व्यक्ती कशी बनवते,हे महत्त्वाचं वाटतं मला. आपण इतरांशी कसे वागतो यावरून आपण एक उत्तम व्यक्ती आहोत की नाहीत हे ठरतं.
>
> तुम्हां कुमार वयोगटांतल्या मुलामुलींना एक सांगावंसं वाटतं, की आपलं ध्येय साध्य करताना प्रयत्न निष्फळ ठरणे म्हणजे अपयश नसतं, तर जेव्हा ध्येयच कमकुवत असतं, तेव्हा त्याला अपयश म्हटलं जातं.

(२) आकृती पूर्ण करा. ०२

| गिर्यारोहणाने अरुणिमाला प्राप्त झालेल्या गोष्टी | | | |
|---|---|---|---|
| | | | |

(३) स्वमत. ०३

अरुणिमाने उताऱ्यात दिलेला संदेश तुमच्या शब्दात लिहा.

**(आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. महर्षी कर्वे यांच्या कार्यकुशलतेचा ओघ तक्ता तयार करा. ०२**

| |
|---|
| कार्यात नेमकेपणा होता. |

| |
|---|
| |

| |
|---|
| |

| |
|---|
| विचार पक्का झाला की, |

| |
|---|
| |

| |
|---|
| |

महर्षी कर्वे यांनी 'अनाथबालिका श्रमाची मुहूर्तमेढ रोवली. कालांतराने बालिकाश्रमाचे हिंगणा येथे स्थलांतर करून 'हिंगणे स्त्रीशिक्षण संस्था' असे त्यांनी तिचे नामांतर केले. 'पै-पै चा निधी' व 'मुरुडनिधी' त्यांनी जमवला. त्यांच्यावर चाल करून येणाऱ्या समाजालाही या गोष्टीची पूर्ण कल्पना होती, की यांतील पै-पै चा हिशोब कर्व्यांजवळ असणार आहे !कर्व्यांनी जमा केलेल्या निधीची उधळपट्टी तर केवळ असंभव ! कर्वे स्वतः मोटार वापरत नसत. मैलोनगणती लांब असलेल्या आश्रमात ते पायी जात. समाजाचे पैसे वापरणे दूरच स्वतःचे पैसे सुद्धा ते समाजासाठी वापरतात, हे मात्र समाजाला माहीत होते. जेवढे खर्च घरात आवश्यक होते तेवढे, आपल्या कमाईतून, ते करत. उर्वरीत सर्व पैसा ते समाजकार्यात  वापरत. ते स्वतःच्याच विश्वात वावरतात, अशी कुरबूर, घरच्यांच्या मनांत घर करून राहिली होती. वस्तुतः समाज सुस्वरूप करण्याची महर्षी कर्वे यांची जिद्द होती; पण त्या जिद्दीने कुटुंबाला कुठेही कुरूप केले नाही! नेमकेपणा हा गणिताचा गुणधर्म त्यांना तेथे उपयोगी पडला. ते बोलत नसत. विचार करत. विचार पक्का झाला, की आचरणात आणत. त्यांच्या कार्यातूनच लोकांना अंदाज  येई, की त्यांच्या चित्तात काय चालले आहे! हे डावपेच नव्हते; उलटपक्षी, बोलके सुधारक असण्यापेक्षा कर्ते सुधारक असणे, हेच श्रेयस्कर असते !

**(२) चौकटी पूर्ण करा :**

(अ) अनाथ बालिका श्रमाची मुहूर्तमेढ रोवणारे - ☐ ०१

(आ) अनाथ बालिकाश्रमाचे बदललेले नाव - [ ] ०१

**(३) स्वमत : ०३**

महर्षी कर्वे यांचे तुम्हांला जाणवलेले वेगळेपण तुमच्या शब्दांत लिहा.

## अपठितगद्य

**(इ) (१) आकृती पूर्ण करा.** ०२

सौजन्यशील व्यक्तीच्या मनात असलेल्या भावना

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |

सौजन्य हे सृजनांकडून अपेक्षावयाचे असते. ज्यांच्या मनात प्रेम, सहभावना, आपुलकी, स्नेहशीलता आहे, अशांच्या जवळ सौजन्य असते. सौजन्याला नम्रतेची जोड मिळाली तर सोन्याहून पिवळे होते. जगात वावरताना सौजन्यशीलवृत्ती अंगी बाणलेली असली तर अनेक फायदे होऊ शकतात; पण त्याही पेक्षा आपण माणूस आहोत, पशू नाही याची जी जाणीव होते तीच महत्त्वाची असते. ज्याची वृत्तीच आक्रमक असते आणि ज्यांचा स्वभावच जुळवून घेण्याचा नसतो, त्यांची वृत्तीही स्वभावतः पशूची असते. त्यामुळे त्यांच्याजवळ सौजन्य असेल कसे ? सौजन्य ही मानसिकवृत्ती आहे. मनातून ती साकारते व कृतीतून प्रकट होते. व्यवहारात अशा वृत्तीतून जे वागणे होते किंवा आचार घडतो अशाच आचाराला सौजन्य म्हटले जाते. सौजन्यातून प्रेम व्यक्त होते.

**(२) एका शब्दात उत्तर लिहा .** ०२

(अ) सृजनांकडून अपेक्षित असलेले -

(आ) सौजन्यातून व्यक्त होणारे -

**विभाग - २ :पद्य**

**प्र . २ (अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(१) आकृतीपूर्णकरा. ०२**

| कवीने पाखराला करावयास सांगितलेल्या गोष्टी |
|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |

आकाशी झेप घेरे पाखरा
सोडी सोन्याचा पिंजरा

तुज भवती वैभव, माया
फळ रसाळ मिळते खाया
सुख लोलुप झाली काया
हा कुठवर वेड्या घेसी आसरा

तुज पंख दिले देवाने
कर विहार सामर्थ्याने
दरि-डोंगर, हिरवीराने
जा ओलांडुनी या सरिता-सागरा

कष्टाविण फळ ना मिळते
तुज कळते परि ना वळते
हृदयात व्यथा ही जळते
का जीव बिचारा होई बावरा

घामातुन मोती फुलले
श्रमदेव घरी अवतरले
घर प्रसन्नतेने नटले
हा योग जीवनी आला साजिरा

**(२) (अ) शब्दांत उत्तर द्या.** ०१

(अ) पक्षी विहार करण्याचे ठिकाण -

(आ) पाखरास कोठे बंदिस्त केले आहे -

**(आ) खालील काव्यपंक्तीचा अर्थ स्पष्टकरा.** ०१

तुज कळते परि ना वळते

**काव्यसौंदर्य**

(३) सुख लोलुप झाली काया

हा कुठवर वेड्या घेसी आसरा

या काव्यपंक्तीतील विचारसौंदर्य स्पष्ट करा. ०२

**(आ) खालील मुद्द्यांच्या आधारे कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील कृती सोडवा.**

| मुद्दे | आश्वासकचित्र | वस्तू |
|---|---|---|
| (१) प्रस्तुत कवितेचे कवी /कवयित्री-<br>(२) कवितेचा विषय-<br>(३) शब्दांचे अर्थ लिहा- | (१) झरोका-<br>(२) कसब | (१) स्नेह -<br>(२) निखालस - |

**(इ) खाली दिलेल्या काव्यपंक्तीचे रसग्रहण करा.०४**

तुझे शब्द जसे की

महाकाव्य तुझ्या पायाजवळ गळून पडावीत

तुझा संघर्ष असा की

काव्यांच्या संगिनी व्हाव्यात

## विभाग - ३ :स्थूलवाचन

**प्र ३ खालील पैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** ०६

१. मुक्कामामध्ये नियोजनबद्ध प्रवासावर अधिक विश्वास ठेवावा, या लेफ्टनंट स्वाती महाडिक यांच्या विधाना विषयीचे तुमचे विचार स्पष्ट करा.

२. माणसे पेरा | माणुसकी उगवेल,या विधानाचा तुम्हाला समजलेला अर्थ लिहा.

३. गिरीजा किर यांच्या- यडबंबूढब्बू - या बालकादंबरीतील विनोद तुमच्या शब्दांत लिहा.

## विभाग - ४ :भाषाभ्यास

**प्र ४ (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती :**

**१. समास :**

**खालील तक्ता पूर्ण करा.** ०२

| समासाचे नाव | उदाहरण | शब्दाचा विग्रह |
|---|---|---|
| (१) समाहार द्वंद्व समास | केरकचरा | ................ |
| (२) ........... | महादेव | महान असा देव |
| (३) द्विगुसमास | ............. | पाच आरत्यांचा समूह |
| (४) वैकल्पिक समास | खरे खोटे | ...................... |

**२. शब्दसिद्धी :**

**खालील तक्ता पूर्ण करा : ०२**

(झोपाळू, अतिरेक, लुटूपुटू, सामाजिक)

| प्रत्ययघटित | उपसर्गघटित | अभ्यस्त |
|---|---|---|
| ............... | ................. | ............ |
| ............... | ................. | ............ |

**३. वाक्प्रचार :**

**खालील पैकी कोणत्याही दोन वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.** ०४

(१) शिरोधार्य मानणे

(२) शाबूत ठेवणे

(३) खस्ता खाणे

(४) हुकूमत गाजवणे

**(आ) भाषिक घटकांवर आधारित कृती :**

**(१) शब्दसंपत्ती :**

**(१) खालील शब्दाचे कमीत -कमी दोन समानार्थी शब्द लिहा :** ०१

वारा -

**(२) खालील शब्दांचे वचन बदला : ०१**

(१) समुद्र -

(२) काठी -

**(३) खालील शब्द समूहासाठी एकशब्द लिहा :** ०१

**(कोणतेही दोन शब्द सोडवा)**

(१) समाजाची सेवा करणारा -

(२) संपादन करणारा -

(३) दररोज प्रसिद्ध होणारे -

**(४) खालील शब्दातील अक्षरांपासून दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा :** ०१

वतनदार ( राखण व दार हे शब्द वगळून )

**(२) लेखन नियमानुसार लेखन :** ०२

**अचूक शब्द ओळखा .(कोणतेही चार सोडवा ) :**

(१) उत्स्फुर्त/ उत्स्फूत/ ऊत्स्फूर्त/ उत्स्फूर्त

(२) नीर्जीव/निर्जिव/नीर्जिव/निर्जीव

(३) दूर्मीळ/दुर्मिळ/दूर्मिळ/दुर्मीळ

(४) सम्मान/संमान/सन्मान/सनमान्

(५) पीढी/पिढी/पिढि/पीढि

(६) अतर्मुख/अंतर्मुख/अंर्तमुख/अंतर्मूख

**(३) विरामचिन्हे :** **०१**

**खालील वाक्यातील चुकीची विरामचिन्हे बदलून वाक्य पुन्हा लिहा :**

ते म्हणाले; - लक्षात नाही आलं!

**(४) पारिभाषिक शब्द :** **०१**

**खालील शब्दांना प्रचलित मराठी शब्द लिहा :**

(१) Highway

(२) Agent

**विभाग - ५ :उपयोजित लेखन**

**प्र ५ (अ) खालील कृती सोडवा :** **०६**

**(१) पत्र लेखन :**

**खालील निवेदन वाचा व त्या खालील कृती सोडवा.**

**त्वरा करा !त्वरा करा !त्वरा करा !**

विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी

| दि.२७ नोव्हें.ते २ डिसेंबर | सवलतीच्या दरात | खिसाआवृत्ती |
|---|---|---|

**शुद्धलेखन माझ्या खिशात !**

नित्योपयोगी शब्दकोश

(योग्य -अयोग्य लेखन निर्देशांसह)

दि. ३ डिसेंबर रोजी शुद्धलेखन स्पर्धेचे आयोजन व भव्य बक्षीस योजना

विद्यार्थीप्रमुख या नात्याने शाळेसाठी वरील पुस्तकांच्या प्रतींची मागणी करा.

शुद्धलेखन स्पर्धेत जिल्ह्यातून प्रथम पारितोषिक मिळवलेल्या मित्रास/ मैत्रिणीस अभिनंदनाचे पत्र लिहा.

**(२) विभाग - १ पद्य (इ) [(प्रश्न १ (इ)] मधील अपठित गद्य उतारा वाचा व त्याचा एक तृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा :**

**(आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** (शब्दमर्यादा ६० ते९० ) **१०**

**(१) जाहिरात लेखन :**

खालील शब्दांचा योग्य उपयोग करून आकर्षक जाहिरातत यार करा.

| | | | |
|---|---|---|---|
| ग्रंथप्रदर्शन | स्थळ-नागपूर | आयोजक - अक्षरधारा वाचनालय | १० % सवलत |

**(२) बातमी लेखन :**

आदर्श विद्यालय परभणी येथील शाळेतील- रूबेला लसीकरणाची बातमी - खालील शब्दांवरून तयार करा.

- रूबेला लसीकरण
- शालेय स्तराव रस्पर्धा
- २० ते २५ नोव्हेंबर
- भित्तिपत्रक/रांगोळी/चित्रकला
- स्थानिक शासकीय आरोग्यविभाग व आदर्श विद्यालय

**(३) कथा लेखन :**

खालील कथेचा पूर्वार्ध दिलेला आहे. कथेचा उत्तरार्ध लिहून कथा पूर्ण करा.

(दिलेली कथा लिहिण्याची गरज नाही)

आई जावं नागं कधीतरी फिरायला! किती सारखी कामातच गुंतलेली असते! दिवाळीच्या सणाला आलेली समीक्षा आज पुन्हा आईला म्हणत होती. निर्मलाताईंनी कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त केलीनाही. विचारच करत राहिल्या. तेवढ्यात शेजारचे तात्या आले, --वहिनी गावातल्या सर्व बायकांना ज्येष्ठनागरिक संघातर्फे परदेशवारी घडवायचा विचार आहे, येता का? निर्मलाताई काही बोलायच्या आधी समीक्षाच म्हणाली, --हो येणार आहे. समीक्षाने आपल्या भावाच्या-अविनाशच्या मदतीने लगेचच तिकिट, व्हिसा वगैरे सर्व गोष्टी पूर्ण केल्या. पुढल्याच महिन्यात जाणार होते. सर्व तयारी झाली होती.निर्मलाताई तयार झाल्या होत्या;पण फार मनापासून नाही. आता दोनच दिवस राहिले होते आणि अविनाशचा फोन आला....

**(इ) लेखन कौशल्य :** ०८

खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृतीसोडवा.

**(१) प्रसंगलेखन:**

| |
|---|
| अहमदनगर जिल्हा परिषद<br>शालेय शिक्षण विभाग आयोजित -<br>आंतरशालेय क्रीडा स्पर्धा - दि. २४ ते २७ डिसेंबर<br>वेळ - सकाळी०८ते ११ |

वरील स्पर्धेतील खो-खोच्या स्पर्धेत तुम्ही सहभागी होतात अशी कल्पना करून प्रसंगलेखन करा.

**(२) आत्मकथन :**

समुद्र= खंत - महत्व /उपयुक्तता - संदेश - निसर्गसौंदर्य

**(३) वैचारिक लेखन :**

| |
|---|
| वृक्ष लावा, देश वाचवा |

| | | | |
|---|---|---|---|
| सौंदर्य | उपयोग /फायदे | वृक्षतोडीचे परिणाम | वृक्षसंवर्धनासाठी उपाय |